महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

Web Site :- www.rdtenagpur.org.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२०२२/ 479 दिनांकः- 21 FEB 2022

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- महाविद्यालयात प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्याचे महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाची नोंदणी करण्याबाबत.

संदर्भः- १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/ विकाना/डीबीटी पोर्टल /२०२२/१५५ दि. १७/०१/२०२२

२) सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण, नागपूर यांचे पत्र जाक्र. सआसकना/शिष्य./महाडिबीटी अर्ज नोंदणी/२०२१-२२/२८८ दि. १० /०२ /२०२२.

सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्याचे अर्ज मागविण्याची ऑनलाईन प्रक्रिया दि. १४/१२/२०२१ पासून सुरू करण्यात आलेली असून सदर योजनांतर्गत **आपल्या संस्थेतील प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील शिष्यवृत्तीस पात्र असलेले विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करून मंजूरीस्तव पाठविण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये आपणांस कळविण्यात आलेले आहे.** परंतु अद्याप पर्यंत संस्थास्तरावर विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये संबंधित विभागामार्फत पुनःश्च या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

तरी याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थास्तरावरून विहीतमुदतीत कार्यवाही करण्यात यावी. जेणे करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणे शक्य होईल.

तसेच आपण न केलेल्या कार्यवाही मुळे पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती पासून वंचित राहीले तर यांची सर्वस्वी जबाबादारी प्राचार्याची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

सहपत्रः- संदर्भिय पत्र क्र. ०२ संलग्न

प्रतः- सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण, नागपूर , यांना माहितीकरिता .

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर.**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर,श्रध्दानंदपेठ,नागपूर-२२
दुरध्वनी / फॅक्स क्र.०७१२-२२२१०४१, ई-मेल- sdswo.nagpur@gmail.com

**जाक्र.सआसकना/भासशि/ २०२१-२२/ 288** **दिनांक :- 10 / 2 /२०२२**

प्रति,
1) मा. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठए नागपूर.
2) मा. कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर.
3) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभाग, नागपूर.
4) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, नागपूर.
5) मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :-** महाविद्यालयात प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जांची नोंदणी महाडिबीटी पोर्टलवर करण्यासाठी आपले स्तरावरून सुचना निर्गमित करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय सादर करण्यात येते की, सन 2021-22 या शैक्षणिक वर्षाकरीता शासनाने SC,OBC,SBC,VJNT या प्रर्वगातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क या योजनेचे महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याकरीता दिनांक 14/12/2021 पासुन ऑनलाईन प्रक्रीया सुरु झालेली आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची अंतीम मुदत दि. 31/01/2022 ही देण्यात आलेली होती. परंतु SC प्रवर्गातिल 27% व OBC,SBC,VJNT प्रवर्गातिल 31% विद्यार्थ्यांनी अदयापही अर्ज भरलेले नसल्याकारणाने अर्ज भरण्याची मुदत SC प्रवर्गाकरीता दि.15/02/2022पर्यंत व OBC,SBC,VJNTया प्रवर्गाकरीता दि. 28/02/2022 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. महाविद्यालयातील SC,OBC,SBC,VJNT या प्रर्वगातील शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयाची आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयातील वरील प्रवर्गातील सर्व पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी महाविद्यालयाने महाडीबीटी पोर्टलवर तात्काळ करुन घेणे अपेक्षित आहे.

मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांची 100 टक्के नोंदणीकरण होण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर भरलेले अर्ज सर्व महाविद्यालयाने तातडीने तपासणी करुन त्यापैकी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याकडे पाठवावेत. तसेच ज्या महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क मंजुर नसतील त्या महाविद्यालयाने संबंधीत यत्रणेकडून शैक्षणिक शुल्क तातडीने मंजुर करुन घ्यावे. कोणत्याही परिस्थीतीत मागासवर्गीय पात्र विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहणार नाही. याबाबतच्या आपले स्तरावरून आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना आदेशवजा सूचना निर्गमित करण्याची कृपा करावी जेणेकरून मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या शिष्यवुत्ती योजनांचा लाभ अदा करणे या कार्यालयास शक्य होईल.

माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू
(बाबासाहेब देशमुख)
सहायक आयुक्त.
समाज कल्याण नागपूर.

सहसंचालक तंत्र शिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर.
आवक क्रमांक....740.........
दिनांक....16 FEB 2022